-: प्रेसनोट दिनांक - २२/०१/२०२५ :-

**आरोपी अविनाश अशोक सुतार,वय - ३३ वर्षे, पद - ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले, पंचायत समिती हातकणंगले जि.कोल्हापूर (अस्थायी), रा. हनुमान मंदिर जवळ, हासुर दुमाला, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

यातील तक्रारदार यांचे आईचे नावे शासनाच्या रमाई आवास घरकुल योजना सन २०२३- २०२४ मधुन घरासाठी लाभार्थी म्हणुन १,५०,०००/- रूपये मंजुर झालेले आहेत. मंजुर झालेले पैसे ०५ टप्यामध्ये मिळतात. त्यातील ०३ टप्याचे १,००,०००/- रूपये तक्रारदार यांच्या आईच्या बॅक खात्यावर जमा झालेले आहेत. उरलेले ०२ टप्याचे पैसे कधी जमा होणार हे विचारण्यासाठी तक्रारदार हे दिनांक १०/०१/२०२५ रोजी हातकणंगले पंचायत समिती येथे गेले होते. त्यावेळी तेथे ते रमाई आवास घरकुल योजनचे काम पाहणारे अविनाश सुतार, ग्रामिण गृहनिर्माण अभियंता जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले यांना भेटले. त्यावेळी सुतार यांनी तक्रारदार यांचेकडे रमाई आवास घरकुल योजनेचे राहीलेले दोन हप्ते जमा करणेसाठी १३,०००/- रूपये दया, त्याशिवाय राहीलेले हप्ते जमा होणार नाहीत. असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. तशी तक्रार तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे दिलेली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये, तक्रारदार यांचेकडे अविनाश सुतार, ग्रामिण गृहनिर्माण अभियंता जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले यानी १३,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/- रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली त्यामध्ये पंच व साक्षीदारांचे समक्ष अविनाश सुतार, ग्रामिण गृहनिर्माण अभियंता जि.प.उपविभाग बांधकाम हातकणंगले यांनी तक्रारदार यांचेकडुन १०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना पकडणेत आले.

सदरबाबत आरोपी **आरोपी अविनाश अशोक सुतार,वय - ३३ वर्षे, पद - ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, जि.प.उप विभाग बांधकाम हातकणंगले, पंचायत समिती हातकणंगले जि.कोल्हापूर (अस्थायी), रा. हनुमान मंदिर जवळ, हासुर दुमाला, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द गांधीनगर पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे दिनांक २१/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करणेत आला आहे.व आरोपीला न्यायालयात हजर केलेनंतर ०१ दिवसाची पोलीस कस्टडी मिळाली आहे.**

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. डॉ. शीतल जान्हवे खराडे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, अति.कार्य.पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. विकास माने, पो.ना. सुधिर पाटील, म.पो.ना.संगिता गावडे, पो.कॉ. उदय पाटील, चा.पो.कॉ. प्रशांत दावणे ला.प्र.वि.कोल्हापूर ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४,
०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३.